# मराठी युवकभारती

वेळ : ३ तास | मार्च - २००९ | एकूण गुण : ८०

**प्रश्न १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा : (१०)**

(१) संगणक : आपला मित्र
(२) एकविसाव्या शतकातील स्त्री
(३) समुद्र आटला तर ......
(४) शेतकऱ्याचे मनोगत
(५) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

**प्रश्न २. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा : (८)**

(१) 'डुळकैलेया बाळकाचा दृष्टांत' या पाठातील दृष्टांत आणि दार्ष्टांतिक स्पष्ट करा.
(२) यशवंतराव चव्हाण यांच्या मते युवकांसमोर कोणती सामाजिक व राजकीय आव्हाने आहेत ?
(३) लेखकाने महात्मा फुले यांना 'देवमाणूस' असे का म्हटले आहे ?

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : (८)**

(१) 'कल्पद्रुमाची डहाळी' या पाठाच्या आधारे पारोचे स्वभावविशेष स्पष्ट करा.
(२) फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी जर्मन लोकांच्या कष्टप्रियतेचे वर्णन कसे केले आहे ?
(३) खडकावर फुलणारी फुले पाहून महावीर जोंधळे यांच्या मनात कोणते विचार आले ?
(४) रजिया पटेल यांच्या वडिलांची शेतमजुरांशी वागणूक कशा प्रकारची होती ?

**प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा : (८)**

(१) संत तुकाराम महाराजांनी वारकऱ्यांच्या भक्तिसोहळ्याचे वर्णन कसे केले आहे ?
(२) 'चाललो' ह्या कवितेत कवीने कोणते जीवनविषयक तत्त्वज्ञान मांडले आहे ?
(३) 'भुंडं टेकाड' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

**प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा : (४)**

(१) संत सावता माळी यांना दैनंदिन व्यवसायामध्ये परमेश्वराचे दर्शन कसे घडते ?
(२) हिरोशिमाच्या विनाशाबद्दलची चीड कवी मर्ढेकरांनी कशा प्रकारे व्यक्त केली आहे ?
(३) पुलाच्या कठड्यावर पाय झुलवत बसलेल्या मुलीविषयी कवयित्री कोणता विचार करते आहे ?

**प्रश्न ६.(क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> गद्य वाक्यातील आशयसौंदर्य स्पष्ट करा :** (४

(१) सुगंधाइतके तीव्र आणि स्वच्छंदी मला अजून काही या दुनियेत आढळले नाही.

(२) त्याला अभिमान वाटत होता आणि आणखीही बरेच काही..........!

(३) आजीबाईंकडून पावली मिळाल्यावर जी खुषी होते ती तुमच्या या दहा रुपयांमधी होत नाही.

**(ख) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा :** (४

(१) धुळि आंतिल रत्न। जरि भेटे न करितां प्रत्न।
तरि चतुरिं येत्न। कां न करावा।।

(२) नभि नक्षत्रे बहुत एक परि प्यारा। मज भरतभूमिचा तारा.

(३) हातातली खोटी बंदूक
कधीही खरी होण्याची भीती.

**(ग) (१) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा :** (२

(१) अहिल्याबाईंच्या सासऱ्यांचे नाव काय होते ?

(२) १९७२ साली पृथ्वीवरून कोणते यान अंतराळात पाठविण्यात आले ?

(३) केरूनानांनी आपल्या मुलींची तुलना कोणत्या वीर महिलांशी केली ?

(४) 'आभाळाएवढा' छत्रपती या पाठाचे लेखक कोण आहेत ?

**(२) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा :** (२

(१) भगवंत कशाचा भुकेला आहे ?

(२) 'झिणिझिणि वाजे बीन' ही कविता कोणत्या कवींनी लिहिली आहे ?

(३) दूर नभाच्या पल्याड कोण उभा आहे ?

(४) कवी नामदेव ढसाळ यांना अजूनही कोणती सकाळ आठवते ?

**प्रश्न ७.(क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १०० शब्दांत लिहा :** (६

(१) नर्मदेच्या कौटुंबिक ताणतणावांचे चित्रण लेखिकेने कसे केले आहे ?

(२) गौरी देशपांडे यांनी 'राजा' कुत्र्याचे शब्दचित्र कसे रेखाटले आहे ?

(३) 'स्पर्श' कथेच्या नायिकेने बुवाच्या डोळ्यांत कसे अंजन घातले ?

**(ख) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ६० शब्दांत लिहा :** (४

(१) 'त्याग' या कथेची नायिका कोणत्या विचारांनी वडिलांच्या संसाराला मदत करीत होती ?

(२) पिराजीला शहरात पाठवायचे गिरिजाचे का ठरविले ?

(३) चंद्रकलेच्या मते सरपंचपद मिळाल्यावर गावाच्या कायापालट कशा प्रकारे करता येईल ?

**प्रश्न ८.(१) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण लिहा :** (२

(१) व्यतिरेक (२) अतिशयोक्ती

**(२) कंसातील सूचनेनुसार कोणत्याही <u>दोन</u> वाक्यांचे रूपांतर करा :** (२

(१) लक्ष्मीनं बंदूक खांद्यावर लावली आणि धाडकन तिनं बार काढला. (केवल वाक्य करा.)

(२) कुऱ्हाड खाली ठेवून तो सरसर आंब्याच्या झाडावर चढला. (संयुक्त वाक्य करा.)

(३) ज्या तरूणाच्या दृष्टीसमोर स्वप्ने नाहीत तो तरूणच नव्हे. (वाक्य प्रकार ओळखा.)

**(३) खालीलपैकी कोणत्याही <u>चार</u> पारिभाषिक शब्दांचे अर्थ लिहा :** (२

(1) Audit (2) Elected (3) Lock-out (4) Report (5) Treasury (6) Zone

(४) **खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार लिहा :** (१)

(१) या समानतेचे पहिले धडे कुटूंबातच गिरवीले जातात.

(२) सुदैवाने त्याचे दुस्परिणाम जानवले नाहीत.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा :**

(१) कुठं जायचं म्हणता"

(२) गावात त्यांना रहीमबाबा म्हणून गावकरी हाक घालत

(५) **खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून स्वत:च्या वाक्यांत उपयोग करा :** (२)

(१) नामोहरम करणे. (२) अडमाप बोलणे

(३) रूद्रावतार धारण करणे. (४) जीव की प्राण असणे.

**प्र. ९. (क) खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा :** (४)

(१) दूरदर्शन केंद्र पाहण्याची अनुमती मागणारे पत्र दूरदर्शन केंद्रसंचालकांना लिहा.

(२) शैक्षणिक शुल्क माफ करण्यासंबंधी तुमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना पत्र लिहा.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** (३)

जसा एखाद्या दगडावर उत्तम, मध्यम किंवा कनिष्ठ कारागिराच्या हातून टाकीचा वगैरे संस्कार घडतो, त्याप्रमाणे व त्या दगडाच्या योग्यतेप्रमाणे त्याची सुंदर व नाजुक जाळी, खांब किंवा एखादी पायरी होते; त्याप्रमाणेच मनुष्याच्या बुद्धीवर उत्तम, मध्यम किंवा कनिष्ठ अशा विचारांचा संस्कार घडतो, त्याप्रमाणे ती उत्तम, मध्यम किंवा कनिष्ठ मार्गास लागते. पडित जमिनीचा दृष्टांतही मनुष्याच्या बुद्धीला बऱ्याच अंशी लागू पडतो. ज्याप्रमाणे पडित जमिनीस खत वगैरे घालून तिची मशागत करावी त्याप्रमाणे ती पिकाऊ होते, असेच मनुष्याच्या बुद्धीचे आहे. म्हणजे जसा तिजवर संस्कार होतो तशी ती होते. सर्व मनुष्यांची बुद्धी अगदी सारखीच नसते, तथापि कोणत्याही मनुष्याच्या बुद्धीवर योग्य संस्कार झाला असता त्याजपासून काहीतरी फलप्राप्ती झाल्यावाचून राहत नाही.

प्रश्न : (१) मनुष्याच्या बुद्धीवर कोणत्या विचारांचा संस्कार घडतो.

(२) पडित जमीन आणि मनुष्याची बुद्धी यांची तुलना लेखकाने कशी केली आहे ?

(३) वरील उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

**किंवा**

वरील गद्य उताऱ्याच्या सुमारे एकतृतीयांश (१/३) एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(ग) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निमंत्रणपत्रिका लिहा :** (३)

(१) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील 'आदर्श शिक्षक' परस्कारप्राप्त शिक्षकांचा सत्कार समारंभ.

(२) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाचा उद्घाटन सोहळा.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर कार्यक्रमपत्रिका तयार करा :**

(१) तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन.

(२) 'अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर व्याख्यान.

**किंवा**

**वर्तमानपत्रासाठी कार्यक्रमाचा वृत्तान्त तयार करा :**

तुमच्या कनिष्ठ महाविद्यालयात पार पडलेल्या रक्तदान शिबिराचा वृत्तान्त वर्तमानपत्रासाठी तयार करा.

❖ ❖ ❖